# सर्व आरोपींना 29 सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी

## वडिलोपार्जित मालमत्तेच्या वादातून मिलिंद लाडचा खून



### सहा आरोपी काही तासांत तुरुंगात

महासागर | प्रतिनिधी

**बडनेरा,( दि.26 )**– बडनेरा परिसर हादरवणाऱ्या पेट्रोलपंप संचालक मिलिंद मुरलीधर लाडहत्येप्रकरणाचा तपास पोलिसांनी अवघ्या काही तासांत उलगडला आहे. प्राथमिक तपासात हा खून वडिलोपार्जित मालमत्तेच्या वादातून सुपारी देऊन घडवून आणल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी पोलिसांनी सहा आरोपींना अटक केली असून, दोन विधिसंघर्षीत बालकांना ताब्यात घेतले आहे. यातील सर्व आरोपींना 29 सप्टेंबर पर्यंत पोलीस कोठडी सुनाविण्यात आली आहे.

25 सप्टेंबरच्या रात्री साडेनऊच्या सुमारास मिलिंद लाड हे सहकारी चंदन मोरे सोबत मोटर सायकलवरून पेट्रोलपंपावरील ड्युटी आटोपून घरी जात होते. त्याचवेळी दोन अनोळखी तरुण कथई रंगाच्या यामाहा गाडीवरून त्यांचा पाठलाग करत अचानक चाकूने हल्ला केला. मिलिंद लाड घटनास्थळीच ठार झाला, तर चंदन मोरे जखमी झाला. आरोपींनी मोरे याला धमकावून घटनास्थळावरून पलायन केले. फिर्यादी गजानन वामनराव लाडयांनी दिलेल्या माहितीनुसार संशयितांचे प्राथमिक वर्णन पोलिसांना मिळाले. तत्काळ पोलिसांनी तपास गतीने सुरू ठेवून आरोपींचा शोध घेतला. या प्रकरणात पोलिसांनी अटक केलेल्या सहा आरोपींमध्ये विक्रम राजेंद्र लाड (32, बारीपुरा, अमरावती), संकेत दिलीपराव लाड (24, बारीपुरा, अमरावती), वैभव रवींद्र टोम्पे (32, कन्या विद्यालय, जुनी वस्ती, बडनेरा), सागर सुभाष पांडे (29, सावळी चौक, बडनेरा), विशु गिरी पाटील (24, योगायोग कॉलनी, चपराशीपुरा, अमरावती) आणि हर्ष जगदीश समुद्रे (23, मातापैल, बडनेरा) यांचा समावेश आहे.

# पंचवटी चौकात भाजप-काँग्रेस समोरासमोर

## सोयाबीनच्या वर्षावाने भाजप प्रदेशाध्यक्षांचा ताफा दणाणला ● भाजप स्वागत सोहळ्याला काँग्रेसचा धडक मोर्चा



### भाजपकडून फक्त भाषणांची खैरात

काँग्रेसने म्हटले की, अशा परिस्थितीत तातडीने शेतकऱ्यांना मदत केली पाहिजे; पण भाजपकडून फक्त स्वागत सोहळे आणि भाषणे देण्यात येत आहेत, ठोस उपाय नाहीत. या कारणास्तव कार्यकर्त्यांनी अमरावतीत थेट ताफ्यावर निषेध व्यक्त केला. भाजपकडून घटनास्थळी पोलिस सुरक्षा मजबूत केली गेली आणि तातडीने ताफा पुढे नेला. मात्र या घटनेमुळे शहरात काही तास सामाजिक व राजकीय तणाव निर्माण झाला. या घटनेत शेतकऱ्यांच्या हालचालींवरून जनमानस आणि राजकारण्यांमध्ये चर्चा सुरू आहे. राज्यभरातील शेतकऱ्यांचे पिके नष्ट होण्याचे, घरांचे नुकसान व अतिवृष्टीमुळे झालेल्या समस्यांचा त्वरित निर्णय घेणे, हीच सरकारच्या पुढील उपाययोजनांची गरज असल्याचे राजकीय वर्तुळातही म्हटले जात आहे.

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 26 )** – अतिवृष्टीमुळे हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने भरपाई द्यावी, अशी मागणी करत काँग्रेस रस्त्यावर उतरली आणि थेट भाजप प्रदेशाध्यक्षांच्या ताफ्यावर आपला संताप व्यक्त केला. या राड्यात काँग्रेस कार्यकर्त्यांनी प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या वाहनावर सोयाबीन फेकून निषेध नोंदवला. पंचवटी चौकात झालेल्या या घटनेमुळे मोठा गोंधळ उडाला, काही काळ वाहतूक ठप्प राहिली.

भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण शिक्षक मतदारसंघ निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर अमरावतीत पदाधिकारी मेळाव्यासाठी आले होते. पंचवटी चौकात भाजपाच्या वतीने जोरदार स्वागत सुरू असतानाच, काँग्रेसच्या तालुका अध्यक्ष अमित गावंडे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा मोर्चा चौकात धडकला. चव्हाण यांचा ताफा ज्या मार्गे निघत होता, तिथेच संतप्त कार्यकर्त्यांनी सोयाबीन फेकले.

या राड्यामुळे चौकात गोंधळ माजला आणि पोलिसांना मध्यस्थी करावी लागली. काही काळ वाहतूक पूर्णपणे ठप्प झाली, तर आसपासच्या नागरिकांमध्ये देखील भीतीचे वातावरण निर्माण झाले. काँग्रेस कार्यकर्त्यांनी सांगितले की, राज्यातील अनेक भागांमध्ये पावसाचा कहर सुरू असून शेतकऱ्यांची पिके नष्ट झाली आहेत, घर-दार व जनावरांचे नुकसान झाले आहे.



# सोयाबीन, कापूस, संत्राचे तत्काळ पंचनामे करावेत

### पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे



महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 26 )**– गेल्या काही दिवसात जिल्ह्यात सर्वत्र झालेल्या पावसामुळे शेत पिकांचे मोठे नुकसान झाले आहे. सततच्या पावसामुळे पोषक वातावरण नसल्याने सरसकट नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांना शासनाकडून मदत होण्यासाठी सोयाबीन, कापूस, संत्रा पिकांचे तातडीने पंचनामे करावेत, असे निर्देश पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

जिल्हा परिषदेतील सभागृहात आज विविध विषयांचा आढावा घेण्यात आला. यावेळी खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार रवी राणा, प्रताप अडसड, राजेश वानखेडे, प्रवीण तायडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील गेल्या काही दिवसामध्ये झालेल्या पावसामुळे शेत पिकाचे नुकसान झाले आहे. त्यामुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना शासनाकडून मदतीची अपेक्षा आहे. याबाबत लोकप्रतिनिधींनी पालकमंत्री यांच्याकडे अपेक्षा व्यक्त केली. शासनाच्या नियमानुसार एका मंडळात 65 मिलिमीटर पेक्षा जास्त पावसाची नोंद किंवा पूर परिस्थिती आलेल्या भागात शेतपिकाच्या नुकसानीचे पंचनामे करण्यात येत आहे. मात्र सप्टेंबर महिन्यात झालेल्या सततच्या पावसामुळे हाती आलेले पीक पूर्णपणे नष्ट झाले आहे. त्यामुळे सरसकट पंचनामे हाती घेण्यात यावे. यासाठी कृषी विभागासह महसूल विभागानेही तातडीने पावले उचलावीत. येत्या कालावधीत मंत्रिमंडळाच्या बैठकीत याबाबत चर्चा करून शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी मदत होईल, अशा प्रकारे निर्णय घेण्यात येईल. नुकसान भरपाई पोटी 108 कोटींचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. यासाठी याद्या तातडीने अपलोड करण्यात याव्यात.

बेघरांना घरे मिळण्यासाठी पट्टेवाटप हा महत्त्वाचा कार्यक्रम शासनाने हाती घेतला आहे. प्रामुख्याने ग्रामीण भागात याबाबत तातडीने कारवाई करून जिल्हाभरात पन्नास हजार पट्टेवाटप करण्याची उद्दिष्ट ठेवावे. यासोबतच पाण्याची पातळी वाढवण्यासाठी जलसंधारणाची कामे उत्तम प्रकारे करण्यावर भर देण्यात यावा. जिल्ह्यातील तलावांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. याचा योग्यप्रकारे विनीयोग व्हावा. तसेच जुने झालेले जलसंधारणाचे बंधारे पुनर्जीवित करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. तसेच लाडकी बहिणी योजनेत असंख्य महिलांची नावे वगळल्याने त्यांना मिळणारी मदत बंद झाली आहे. याबाबतही अपात्र महिलांची यादी तातडीने लोकप्रतिनिधींना पुरविण्यात यावी.

यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी महापात्र यांनी जिल्हा परिषदेतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचे सादरीकरण केले.

### ग्रामीण भागात कलम 37( 1 ) व ( 3 ) लागू

**अमरावती** – जिल्ह्यात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी पोलीस अधीक्षक (ग्रामीण), अमरावती यांनी महाराष्ट्र पोलिस अधिनियम 1951 चे कलम 37 (1) व (3) अन्वये प्रतिबंधात्मक आदेश जारी केला आहे. सदर प्रतिबंधात्मक आदेश जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, याकरिता पोलिस आयुक्तालय परिक्षेत्र वगळून अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण भागात लागू करण्यात आला असून दि. 6 ऑक्टोबर 2025 च्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहील. या कलमाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे अपर जिल्हादंडाधिकारी अनिल भटकर यांनी कळविले आहे.

### बोलेरो पिकअपसह नऊ गाढव पोलिसांच्या ताब्यात

**दर्यापूर** – येवदा येथील आठवडी बाजारातून नऊ गाढव चोरीला गेल्याची घटना गुरुवारी उघडकीस आली आहे. या प्रकरणी पोलिसांनी बोलेरो पिकअप गाडीसह गाढव जप्त करून गुन्हा नोंदवला आहे. फिर्यादी पूरण खडे (रा. इंदिरा नगर, येवदा) यांनी पोलिसात दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी रात्री बाजारात सोडलेले त्यांचे गाढव तसेच ओळखीच्या इतर पाच जणांचे गाढव अचानक गायब झाले. गावात शोध घेतल्यानंतरही गाढव न सापडल्याने चोरी झाल्याचा संशय व्यक्त करण्यात आला. दरम्यान, गुरुवारी फिर्यादीस माहिती मिळाली की पोलिसांनी बोलेरो पिकअप (क्र. एपी 39 युडी 1416) ताब्यात घेतली असून त्यामध्ये गाढव असल्याचे समजले. पोलिस ठाण्यात जाऊन तपास केला असता, गाडीत फिर्यादी व त्यांच्या सोबत्यांची एकूण नऊ गाढव सापडली. प्रत्येक गाढवाची किंमत सुमारे 15 हजार रुपये असून, एकूण 1 लाख 35 हजार रुपयांचे गाढव चोरीस गेले होते.

# आशिष धर्माळे शिंदे गटाच्या शिवसेनेचे जिल्हाध्यक्ष



**अमरावती** – शिवसेनेचे जुने कार्यकर्ते आणि अमरावती पंचायत समितीचे माजी सभापती आशिष धर्माळे यांची शिवसेना (शिंदे गट) च्या जिल्हाध्यक्ष पदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती जिल्ह्यातील शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे कारण ठरली आहे. नियुक्तीनंतर बोलताना आशिष धर्माळे यांनी सांगितले की, उप मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली ते जनसामान्यांच्या हितासाठी काम करण्यास नेहमीच पुढे राहतील. त्यांनी असेही स्पष्ट केले की, जिल्ह्यातील प्रत्येक शिवसैनिकाला एकत्र आणून शिवसेनेची मजबूत पायाभरणी करण्यासाठी त्यांनी सर्वतोपरी प्रयत्न करणार आहेत. शिवसेनेच्या कार्यकर्त्यांमध्ये या नियुक्तीचा आनंद आहे. आशिष धर्माळे यांनी आपले अनुभव, जनसंपर्क कौशल्य आणि प्रशासनातील जाणिवा यांचा वापर करून अमरावतीत पक्षाच्या विकासासाठी ठोस भूमिका बजावण्याचे आश्वासन दिले. जिल्ह्यातील सामाजिक, सांस्कृतिक आणि विकासात्मक उपक्रमांमध्ये सहभाग वाढवणे, जनतेच्या समस्या लवकर सोडवणे आणि पक्षाच्या ध्येयांना प्रोत्साहन देणे हे त्यांच्या प्राथमिक उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले.

# शेअर मार्केट फसवणुकीतील आरोपी नालासोपारा येथून अटक

## अमरावती सायबर पोलिसांची मोठी कारवाई

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 26 )** – शेअर मार्केटमध्ये उच्च नफ्याचे आमिष दाखवून तब्बल 70 लाख 6 हजार 47 रुपये 20 पैसे इतक्या रकमेची ऑनलाईन फसवणूक करणाऱ्या एका आरोपीला सायबर पोलिसांनी पालघर जिल्ह्यातील नालासोपारा येथून अटक केली.

6 ऑगस्ट रोजी तक्रारदाराला व्हॉट्सॲप ग्रुपमध्ये ॲड करून क्यूआयबी, ब्लॉक ट्रेडिंग, आयपीओ आणि ओटीसी ट्रेडिंगच्या नावाखाली मोठा नफा मिळेल असे आश्वासन देत फसवणूक करण्यात आली होती. त्यानंतर सायबर पोलीस स्टेशन, अमरावती शहरात गुन्हा दाखल झाला होता. तपासादरम्यान फिर्यादीकडून फसवलेल्या रकमेपैकी 3 लाख रक्कम आरपीएल बँकेतील आरोपीच्या खात्यात जमा झाल्याचे निष्पन्न झाले. आरोपीचे नाव मंजीत मनवीरसिंग टाक (वय 25, व्यवसाय प्रॉपर्टी डिलर, रा. यशवंत एम्पायर, नालासोपारा पूर्व, जि. पालघर) असे आहे. या खात्यातून आरोपीने पैसे विविध खात्यांमध्ये ट्रान्सफर केल्याचे समोर आले असून, संबंधित रकमेवर लीन मार्क लावण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीकडून सॅमसंग मोबाईल (किंमत 7,500) जप्त केला असून न्यायालयीन आदेशानुसार त्याला पोलीस कोठडी मिळाली आहे. या प्रकरणातील इतर फरार आरोपींचा शोध सुरु आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांच्या मार्गदर्शनाखाली उपायुक्त रमेश धुमाळ, एसीपी शिवाजी बचाटे यांच्या देखरेखीखाली करण्यात आली. तपास पथकात पोलीस निरीक्षक महेंद्र अंभोरे, सहायक पोलिस निरीक्षक अनिकेत कासार, प्रियंका कोटावार, उल्हास टवलारे, पोलिस हवालदार उल्हास टवलारे, निखील माहुरे, अभिराज इंदुरकर, अनिकेत वानखडे, वसिम खान, सुषमा आठवले यांचा समावेश होता.

# खांबावरून पडून तरुण विज कर्मचारी ठार

## नांदगाव पेठ एमआयडीसी मधील घटना | कर्मचारी व गावकऱ्यांमध्ये हळहळ

महासागर | प्रतिनिधी

**अमरावती, ( दि. 26 )** – नांदगाव पेठ एमआयडीसी परिसरात वीजपुरवठा खंडित झाल्यानंतर तो सुरळीत करण्यासाठी महावितरणच्या बाह्य स्त्रोत कर्मचारी वैभव इंगळे (वय 24) यांचा करंट लागून दुर्दैवी मृत्यू झाला. भर पावसात खांबावर चढून काम सुरू असताना जनरेटरच्या रिव्हर्स प्रवाहामुळे खांबावरच करंट लागून ते खाली कोसळले. गंभीर अवस्थेत रुग्णालयात हलविण्यात आले; मात्र डॉक्टरांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले.

याबाबत सविस्तर वृत्त असे की,नांदगाव पेठ एमआयडीसीमध्ये शुक्रवारी सायंकाळी 6 वाजताच्या दरम्यान वीजपुरवठा खंडित झाल्यामुळे तो सुरळीत करण्यासाठी महावितरणचे बाह्यस्त्रोत कर्मचारी वैभव इंगळे रा. डिगरगव्हाण हे तातडीने खांबावर चढून वीजपुरवठा सुरळीत करण्याचा प्रयत्न करत होते मात्र.कंपन्यांमध्ये असलेल्या मोठमोठ्या जनरेटरचा रिव्हर्स प्रवाह आल्यामुळे वैभव इंगळे यांना विजेचा मोठा झटका लागला आणि ते खाली कोसळले. अचानक घडलेल्या या घटनेमुळे सर्वच कर्मचारी भयभीत झाले होते.

खाली पडलेल्या वैभव इंगळे यांना तातडीने रुग्णवाहिकेद्वारे रुग्णालयात दाखल केले मात्र उपचारापूर्वीच वैभव इंगळे यांनी जगाचा निरोप घेतला होता. वैभव इंगळे हे मूळचे डिगरगव्हाण येथील रहिवासी असून गेल्या वर्षीच त्यांचा विवाह झाला होता. या घटनेने नांदगाव पेठ एमआयडीसी सह संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत असून महावितरणच्या कर्मचारी बांधवांतही शोककळा पसरली आहे. वीज कर्मचाऱ्यांच्या जिवावर बेतणाऱ्या धोका-दायक कामाच्या परिस्थितीकडे यानिमित्ताने गंभीर लक्ष वेधले जात आहे.

# शहर विकासाची कामे तातडीने पूर्ण करा : पालकमंत्री बावनकुळे

## महापालिकेचा आढावा घेत पालकमंत्र्यांनी दिले मार्गदर्शन; विविध उपक्रमांचे उद्घाटन





महासागर | प्रतिनिधी

**अमरावती,( दि.26 )** – अमरावती शहराच्या सर्वांगीण विकासासाठी शासनाची बांधिलकी असल्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज महापालिकेचा आढावा घेत स्पष्ट केले. रस्ते, पाणीपुरवठा, ड्रेनेज, स्वच्छता, अतिक्रमण निर्मूलन व इतर मूलभूत सुविधा प्राधान्याने पूर्ण कराव्यात, तसेच कामे वेळेत, गतीने व पारदर्शकपणे पूर्ण करावीत, असे त्यांनी यावेळी निर्देश दिले.

पालकमंत्री बावनकुळे यांच्या बैठकीस खासदार डॉ.अनिल बोंडे, आमदार संजय खोडके, सुलभा खोडके, रवि राणा, राजेश वानखडे, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, महापालिका आयुक्त सौम्या शर्मा चांडक तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते. स्वच्छ भारत अभियान अंतर्गत कचरा संकलन, विलगीकरण आणि नियमित स्वच्छता काटेकोरपणे करण्यावरही भर दिला गेला. शहरातील नागरिकांसाठी पाणीपुरवठा, पाइपलाइन दुरुस्ती, टंचाईग्रस्त भागात उपाययोजना, डिजिटल तक्रार निवारण प्रणाली प्रभावी करणे तसेच त्वरित प्रतिसाद देणे आवश्यक असल्याचे पालकमंत्र्यांनी सांगितले. अमरावती हे आपले शहर आहे. नागरिकांचा सक्रीय सहभाग मिळाल्यास शहर विकासाला गती मिळेल, असे ते म्हणाले. यावेळी महानगरपालिकेच्या विविध उपक्रमांचे उद्घाटन ही पालकमंत्र्यांच्या हस्ते झाले. यामध्ये ई-गव्हर्नन्स उपक्रम – केंद्रीकृत नागरिक डॅशबोर्ड, ब्लॉकचेन वापर, कामगार प्रमाणपत्रांसाठी वेब पोर्टल, 'महापालिका संदेशिनी'न्यूज पोर्टल, कूल रूफ नियमावली 2025, शहरी आरोग्य वेलनेस केंद्रांचे ऑनलाइन लोकार्पण समाविष्ट होते. बैठकीत आमदार संजय व सुलभा खोडके यांनी भाड्याच्या करात सुधारणा करण्याची मागणी केली; यावर पालकमंत्री बावनकुळे यांनी त्वरीत सूचना दिल्या. अंबा नाल्यातील गाळ काढणे, ब-श्रेणी तीर्थक्षेत्र मान्यता, स्मार्ट स्ट्रीट लाईट, पीएम ई-बस सेवा, छत्री तलाव सौंदर्यीकरण, जवाहर गेट जतन, नवीन प्रशासकीय इमारत, शाळा व मॉडेल यूपीएचसी उभारणी, दिव्यांग भवन, भुयारी गटार योजना, चौक सौंदर्यीकरण आणि महात्मा फुले संकुलसंबंधी चर्चा करण्यात आली. पालकमंत्री बावनकुळे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सर्व निर्देश तत्काळ अंमलात आणण्याचे आदेश दिले, ज्यामुळे अमरावती शहराचा विकास वेगाने आणि परिणामकारक पद्धतीने साधला जाईल.

# नगरपरिषदेचे पाइप चोरण्याचा प्रयत्न

महासागर | प्रतिनिधी

**मोर्शी ( दि. 26 )** – नगरपरिषदेकडून पाणी पुरवठ्यासाठी ठेवलेले पाइप चोरण्याचा प्रयत्न गुरुवारी दुपारी उघडकीस आला. या प्रकरणी मोर्शी पोलिसांनी सहा जणांविरुद्ध चोरीच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल केला आहे.

फिर्यादी भूषण प्रदीपराव पावडे (39, रा. रविनगर, मोर्शी) यांना माजी जिल्हा परिषद सदस्य संजय घुलक्षे यांनी माहिती दिली की, नंदस्मित कॉलनीत डी.आय.चे 40 पाइप ठेवलेले असून काही अज्ञात इसम ते ट्रॅक्टरमध्ये चढवत आहेत. पावडे घटनास्थळी पोहोचताच आरोपी ट्रॅक्टरसह पळून गेले. दरम्यान, ट्रॅक्टर (क्र. एमएच 27 यू 9604) चालक जानराव केशवराव मोखरकर याने पोलिस चौकशीत कबुली दिली की, त्याच्यासोबत आकाश प्रल्हाद रामपुरे, विशाल ज्ञानेश्वर नेवारी, बादल प्रल्हाद रामपुरे, अफरोज खान रहमत खान आणि शेख तनवीर पेख रहीम (सर्व रा. गिट्टी खदान, मोर्शी) हे पाइप चोरीसाठी आले होते. सदर पाइप नगरपरिषदेकडून पाणीपुरवठ्यासाठी ठेवलेले असल्याचे तपासातून समोर आले आहे. पोलिसांनी उशिरा रात्री सर्व आरोपिंना अटक केले. या सहाही आरोपींविरुद्ध मोर्शी पोलिसांनी चोरीच्या प्रयत्नाचा गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे.


आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती

मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# वडीलांची मस्करी केली म्हणून केली हत्या

## तीन दिवसातच झाला राजेश इंगळे हत्याकांडाचा खुलासा



महासागर | प्रतिनिधी

**दर्यापुर, ( दि.26 ) – शहरातील सैनिक कॉलनीत घडलेल्या खुनाच्या गुन्ह्यातील आरोपीला पोलिसांनी अवघ्या तीन दिवसांत गजाआड केले. ओम अभयराव देशमुख ( 19, रा. तहसिल कार्यालय समोर, दर्यापुर ) या तरुणाने केवळ किरकोळ कारणावरून राजेश इंगळे ( 54 ) यांचा निर्घृण खून केल्याचे धक्कादायक सत्य समोर आले आहे.**

22 सप्टेंबर रोजी रात्री राजेश इंगळे यांचा मृतदेह धनंजय लॉजच्या मागील बाजूस रस्त्यावर आढळला. इंगळे हे तहसिल कार्यालयात नक्कल विभागात कार्यरत होते. त्यांच्या मुलाने, सौरभ इंगळे (28) यांनी दर्यापुर पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध खुनाची फिर्याद दाखल केली होती. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलिस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत व उपविभागीय पोलिस अधिकारी सतिश कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखा व दर्यापुर पोलिसांनी कसून तपास सुरू केला. सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक माहिती आणि गोपनीय बातमीदारांच्या सहकार्याने पोलिसांना खात्रीलायक धागा मिळाला. अखेर तपासाच्या जाळ्यात ओम देशमुख अडकला. ही कारवाई पोलिस निरीक्षक किरण वानखडे, दर्यापुरचे ठाणेदार सुनिल वानखडे यांच्या नेतृत्वात एपीआय सचिन पवार, पीएसआय सागर हटवार, नितीन इंगोले, मुलचंद भांबुरकर तसेच एपीआय अभय चौथनकर, पीएसआय विशाल दादंळे, पोलीस अंमलदार सुनिल महात्मे, रविंद्र बावणे, बळवंत दाभणे, गजेन्द्र ठाकरे, सचिन मिश्रा, शकिल चव्हाण, सैय्यद अजमत, सुधिर बावणे, चेतन दुबे, निलेश डांगोरे, युवराज मानमोठे, रविन्द्र वर्हाडे, स्वप्निल तंवर, मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजिया, पंकज फाटे, सागर नाठे, शांताराम सोनोने, पोस्टे. दर्यापुर येथील अंमलदार उमेश वाकंपांजर, सिध्दार्थ आठवले, दिपक रेलकर, चंद्रकांत खंडार, निलेश कावतकर, सतोष वालसिंगे, रवी धानोरकर, सायबरचे सागर धापड, शिवा शिरसाठ, रितेश गोस्वामी, विकास अंजीकर, संजय प्रधान, मनोज घवळे, हर्षद घुसे, पोकों प्रशिक वानखडे यांच्या पथकाने पार पाडली.

### लाकडी दांड्याने वार

सुरुवातीला उडवाउडवीची उत्तरे देणाऱ्या ओमने अखेर चौकशीत गुन्ह्याची कबुली दिली. इंगळे यांची त्याच्याशी ओळख होती. घटनेच्या दिवशी किरकोळ कामानिमित्त भेट झाली असता इंगळे यांनी सहजपणे त्याच्या वडिलांना शिवीगाळ केली. या रागातून संतप्त झालेल्या ओमने लाकडी दांड्याने डोक्यावर वार करून इंगळे यांचा खून केल्याचे कबूल केले.



# तात-या ते गडगामालूर रस्त्याच्या कामात अनियमितता



## सरपंचांनी केला आरोप

महासागर | प्रतिनिधी

**धारणी, ( दि.26 )**– तालुक्यातील तातरा ते गडगामालूर दरम्यान मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेतून रस्त्याचे निर्माण झाले आहे. मात्र हे काम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असल्याने, यामध्ये मोठ्या प्रमाणात अनियमितता झाल्याचा गंभीर आरोप तातरा ग्रामपंचायतीचे सरपंच बिसुलाल छोटेलाल दहीकर यांनी केला आहे.

सरपंचांनी या रस्त्याच्या कामाचा तीव्र विरोध व्यक्त केला असून, रस्त्याच्या झालेल्या दुरवस्थेमुळे परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. या रस्त्याच्या कामाची तातडीने चौकशी करून दोषींवर कारवाई करावी आणि रस्त्याचे काम पुन्हा चांगल्या दर्जाचे करावे, अशी मागणी सरपंच दहीकर यांनी केली आहे.



### दोन महिन्यातच वाहून गेला रस्ता

सरपंच बिसुलाल दहीकर यांनी एका चित्रफितच्या माध्यमातून सांगितले की, तातरा ते गडगामालूर दरम्यान मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेंतर्गत काम सुरु आहे, त्या कामाला दोन महिनेही पूर्ण झाले नाहीत आणि येथे रस्त्याची दुर्दशा झाली आहे. रस्ता पावसाच्या पाण्यात पूर्णपणे वाहून गेला आहे. या कामादरम्यान अनेकदा तपासणी करून ठेकेदाराला आणि संबंधित अधिकाऱ्यांना कामाच्या दर्जाबद्दल वारंवार सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, ठेकेदाराने त्यांचे मनमानी करून आणि स्थानिक ग्रामस्थांच्या सूचनांकडे दुर्लक्ष करून निकृष्ट दर्जाचे रोड बांधकाम केले, असा आरोप त्यांनी केला आहे.

# महाराष्ट्रात ओला दुष्काळ जाहीर करुन शेतकऱ्यांना तात्काळ मदत द्या!



महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,( दि.26 )** – गेल्या महिनाभरापासून महाराष्ट्रात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले असून, शेतकरी कुटुंबांवर भयानक संकट कोसळले आहे. या संकटातून शेतकऱ्यांना सावरण्यासाठी तातडीने ओला दुष्काळ जाहीर करून मदत द्यावी, तसेच संपूर्ण कर्जमाफी करावी, अशा मागणीचे निवेदन आज अंजनगाव सुर्जी येथे जिजाऊ ब्रिगेडतर्फे तहसीलदारांना देण्यात आले. मराठवाडा, विदर्भ, कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांमध्ये सततच्या पावसाने पिकांचे अक्षरशः वाटोळे झाले आहे. मराठवाड्यातील शेतकरी अतिवृष्टीमुळे मेटाकुटीला आला असून, तात्काळ मदत न मिळाल्यास उपासमार आणि आत्महत्यांच्या घटनाही घडू शकतात, असा इशारा ब्रिगेडने दिला आहे. पंचनाम्यांच्या विलंबित प्रक्रियेत न अडकता सर्व शेतकऱ्यांना थेट मदत जाहीर करावी, अशी मागणी करण्यात आली. या आंदोलनावेळी जिजाऊ ब्रिगेडच्या महिला सदस्यांनी खराब झालेल्या सत्रांच्या माळा व कोंब फुटलेले सोयाबीन हातात घेऊन शासनाचे लक्ष वेधले. निवेदन देताना सारिका मानकर, स्मिता घोगरे, मीना कोल्हे, छाया खाडे, साधना कोकाटे आदींसह असंख्य महिला उपस्थित होत्या.

# सावंगा सरपंचांचा शेणखत प्रकरणात नोटीसवर स्वाक्षरीस नकार

## उपसरपंच, ग्रा.पं. सदस्यांची गटविकास अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार

महासागर प्रतिनिधी

**चांदूर रेल्वे, ( दि.26 )**– तालुक्यातील सावंगा (बु.) च्या महिला सरपंचाने शेणखत प्रकरणात नोटीसवर स्वाक्षरीस नकार दिल्याची तक्रार उपसरपंच, ग्रा.पं. सदस्यांनी गटविकास अधिकाऱ्यांकडे केली आहे.

चांदूर रेल्वे तालुक्यातील सावंगा (बुजरूक) गट ग्रामपंचायत अंतर्गत खरबी (मांडवगड) येथील एका नागरिकाने समाज मंदिरालगत मोठ्या प्रमाणात शेणखत टाकल्याची तक्रार ग्रामपंचायतीकडे प्राप्त झाली होती. या तक्रारीनंतर ग्रामपंचायत प्रशासनाने 3 सप्टेंबर रोजी पहिली नोटीस काढली होती. मात्र संबंधित व्यक्तीने नोटीस नंतरही 24 सप्टेंबरपर्यंत शेणखत न उचलल्याने दुसरी नोटीस काढणे अपरिहार्य झाले.



परंतु सावंगा (बु.) येथील महिला सरपंच भारती बागडे यांनी दुसऱ्या नोटीसवर स्वाक्षरी करण्यास स्पष्ट नकार दिला. त्यांच्या या भूमिकेमुळे ग्रामस्थांना आरोग्य आणि अस्वच्छतेच्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. सरपंचांचा हा नकार मनमानी व एकतर्फी कारभाराचे स्पष्ट उदाहरण असल्याची ग्रामस्थांची प्रतिक्रिया आहे. 24 सप्टेंबर रोजी झालेल्या ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत हा विषय चर्चिला गेला. सभेत सरपंचांचा वर्तनाबद्दल तीव्र नाराजी व्यक्त करत मुंबई ग्रामपंचायत अधिनियम 1958 च्या कलम 39 (1) नुसार सरपंच यांच्यावर कारवाई का करू नये, असा ठराव सभागृहाने एकमताने मंजूर केला. यानंतर ग्रामपंचायत उपसरपंच सारिका सोळंके, ग्रा.पं. सदस्य मतीन शहा, गजानन दुबे व अरुणा कठाळे यांनी गटविकास अधिकारी, चांदूर रेल्वे यांचेकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. ग्रामपंचायत ही संस्था ग्रामविकास व स्वच्छतेसाठी कार्यरत असते. मात्र शेणखत उचलण्याच्या नोटीसवर सरपंचांनी स्वाक्षरीस नकार देऊन जबाबदारी झटकली असल्याने ग्रामपंचायतीच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ग्रामपंचायत सदस्यांकडून या प्रकरणावर तात्काळ चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची मागणी होत आहे.

> सदर तक्रारीवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी लावावी.
>
> **भारती बागडे**
> **सरपंच, सावंगा ( बु. )**



# ग्रामसचिवाने फोन पे वर स्विकारली लाच

## गंभीर आरोप करत ग्रामस्थ धडकले गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात

महासागर प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, ( दि.26 )** – तालुक्यातील कुंभारगाव येथील ग्रामस्थांनी ग्रामसचिव भरत निस्ताने यांच्या कथित अतीरेकी कारभारामुळे संताप व्यक्त केला. घरकुल बांधकाम व घरकुलाची जागा नावावर करून देण्याच्या नावाखाली ग्रामस्थांकडून हजारो रुपये उकळल्याचा आरोप करत ग्रामस्थांनी पंचायत समिती येथे प्र. गटविकास अधिकारी कल्पना जायभाये यांच्या दालनात धडक दिली.

ग्रामस्थांनी सांगितले की, ग्रामसचिवाने नागरिकांकडून केवळ रोकडच नव्हे तर आपल्या मुलगा–मुलीच्या नावाने फोन पे व्यवहाराद्वारे पैसे घेतले आहेत. त्याचे पुरावे म्हणून ग्रामस्थांनी मोबाईलवरील व्यवहारांची हिस्ट्री अधिकाऱ्यांना दाखवली. तसेच गावात अनेक समस्या असतानाही, ग्रामसचिवाने मागील पाच वर्षांपासून एकही ग्रामसभा घेतली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी यावेळी केला. मनमानी, गैरहजेरी व सतत अरेरावीची भाषा वापरण्यामुळे गावातील नागरिक त्रस्त झाल्याचे सांगण्यात आले.

> मी कोणाकडून घरकुलासाठी पैसे घेतले नाही, माझ्यावर करण्यात आलेले सर्व आरोप खोटे असून त्याला कोणताही आधार नाही.
>
> **भरत निस्ताने**
> **ग्रामसचिव, कुंभारगाव.**

### कठोर कारवाईची मागणी

सचिवांवर तत्काळ कठोर कारवाई करून त्याला पदमुक्त करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली. तसेच, ग्रामसचिवाच्या मुला–मुलींच्या बँक खात्यांची तपासणी करावी, अशी मागणीही करण्यात आली. अन्यथा पंचायत समिती आवारात बेमुदत उपोषण करण्याचा इशारा ग्रामस्थांनी दिला. प्र. गटविकास अधिकारी कल्पना जायभाये यांनी ग्रामस्थांची समजूत काढत त्यांच्या तक्रारींची चौकशी करून योग्य तो निर्णय घेण्याचे आश्वासन दिले.

# शिवधाम मंदिर परिसरातील समस्यांवर तोडगा न निघाल्यास उपोषण

## नागरिकांचा इशारा

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि.26 )** – शहरातील शिवधाम मंदिरासमोरील वस्तीत अनेक वर्षांपूर्वी लेआऊट पडून नागरिकांनी प्लॉट घेऊन घरे बांधली. मात्र आजही या वस्तीत मूलभूत सोयींच्या समस्या तशाच प्रलंबित आहेत. रस्ते, नाल्या, लाईट व्यवस्था यांचा अभाव असल्याने नागरिकांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत.



मंदिरासमोरील मुख्य रोड व काही नाल्या झाले असले तरी वस्तीतल्या दोन लहान रस्त्यांकडे (18 ते 20 मीटर) अजूनही दुर्लक्षच झाले आहे. येथील नाल्यांचे पाणी दुसऱ्या नाल्यात सोडण्याची व्यवस्था केली नसल्याने परिसरात अस्वच्छता वाढली आहे. वस्तीमध्ये नाल्या नाहीत, लाईटचीही सुविधा उपलब्ध नाही. विशेष म्हणजे, जेथे लोकवस्तीच नाही तेथे उत्तम रस्ते करून सिमेंट रस्ता टाकण्यात आला; मात्र ज्या वस्तीमध्ये लोक वास्तव्यास आहेत, तेथील नागरिकांकडेच प्रशासनाचे दुर्लक्ष आहे, अशी तीव्र नाराजी रहिवाशांत आहे. या समस्यांबाबत वस्तीतील सर्व नागरिकांनी आमदार चंदू यावलकर यांच्याकडे तक्रार नोंदवली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना सामूहिक निवेदन देऊन चर्चा केली. मात्र अनेक वर्षांपासून निवेदने देऊनही कार्यवाही झालेली नाही.

घाणीचे साम्राज्य, पावसाळ्यातील चिखल व असुविधेमुळे नागरिकांचा संताप उफाळून आला आहे. यापुढील 15 दिवसांत काही ठोस उपाययोजना न झाल्यास वस्तीतले नागरिक आमरण उपोषणाला बसणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. निवेदन देताना शिवधाम मंदिर परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# धोबी समाजाला पूर्वीप्रमाणे आरक्षण मिळावे

## तहसीलदार यांना निवेदन सादर

महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी,( दि.26 )** – महाराष्ट्र राज्यातील धोबी समाजाला डॉ. भांडे समितीच्या शिफारशीप्रमाणे तसेच महाराष्ट्र निर्मितीपूर्वी अनुसूचित जातीत असलेले आरक्षण मिळावे, अशी ठाम मागणी धोबी समाजबांधवांकडून होत आहे.

समाज प्रतिनिधींनी सांगितले की, महाराष्ट्र राज्याची निर्मिती होण्यापूर्वी धोबी समाज अनुसूचित जातीत होता. मात्र नंतर समाजाला आरक्षणातून वगळण्यात आले, यामुळे शैक्षणिक व आर्थिक प्रगतीवर मोठा परिणाम झाला आहे. डॉ. भांडे समितीने समाजाची स्थिती पाहून त्यांना आरक्षणाची शिफारस केली होती. त्या शिफारशी आजतागायत पूर्ण झालेल्या नाहीत. दवाखान्यातील अस्वच्छ कपडे स्वच्छ करणाऱ्यांना आणखी कोणता अस्पृश्यतेचा पुरावा द्यायला पाहिजे असा प्रश्न यावेळी धोबी समाजाने व्यक्त केला. धोबी समाजातील विद्यार्थी व युवकांना शिक्षण, नोकरी व शासकीय योजना यांचा लाभ मिळावा यासाठी आरक्षण तात्काळ लागू करण्यात यावे.

अशी मागणी करून याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा, असे निवेदन शासन दरबारी सादर करण्यात आले आहे. शासनाने लवकरात लवकर याबाबत निर्णय न घेतल्यास राज्यभर आंदोलन छेडले जाईल, असा इशारा समाज बांधवांनी दिला आहे. निवेदन देतेवेळी रुपेश बुंदिले, करण बुंदिले, जगदीश देठे, अरुण बुंदिले, विनोद ठाकरे, सुरेश बुंदिले, चेतन चंदनपत्री, मुकेश चंदनपत्री, कार्तिक चंदनपत्री आदी उपस्थित होते.

# शहरात प्रतिबंधात्मक आदेश लागू

**अमरावती** – शहरात शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी, यासाठी अमरावती शहर पोलीस आयुक्त यांनी महाराष्ट्र पोलिस कायद्याचे कलम 37 (1) व (3) नुसार प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत.

प्रतिबंधात्मक आदेश पोलिस आयुक्तालयाच्या परिक्षेत्रात लागू करण्यात आला आहे. हा आदेश दि. 29 सप्टेंबर ते दि. 13 ऑक्टोबरच्या मध्यरात्रीपर्यंत लागू राहणार आहे. या आदेशाचा भंग करणाऱ्या व्यक्तीविरूद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे, असे पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी कळविले आहे.

# आजवरच्या कालावधीतील सर्वाधिक वाढव्याचा उच्चांक

## कृ.उ.बा.समितीची 20 वी वार्षिक सर्वसाधारण सभा




महासागर | प्रतिनिधी

**अंजनगाव सुर्जी, ( दि.26 )** – अंजनगाव कृषि उत्पन्न बाजार समितीची सन 2024–25 ची 20 वी वार्षिक सर्वसाधारण सभा दि. 25 रोजी समितीच्या प्रांगणात पार पडली. स्थापनेपासून आजवरचा सर्वाधिक उत्पन्नाचा उच्चांक या सभेत नोंदविला गेला. पारीवारीक वातावरणात झालेल्या या सभेला सभासद, मान्यवर, व्यापारी आणि हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### वादग्रस्त सचिवाविरोधात कारवाईची मागणी

सभेत वादग्रस्त सचिव गजानन नवघरे यांच्या अपहारामुळे संस्थेला मोठी हानी झाल्याचे शिक्कामोर्तब करण्यात आले. याबाबत तातडीने कारवाई करण्याची मागणी सभासदांनी केली.

### 91 लाख 32 हजारांचा विक्रमी नफा

दि. 01 एप्रिल 2024 ते 31 मार्च 2025 या आर्थिक वर्षात समितीला 2 कोटी 9 लाख 23 हजार 611 रुपये उत्पन्न झाले. तर खर्च 1 कोटी 17 लाख 91 हजार 031 रुपये इतका झाला. परिणामी समितीला 91 लाख 32 हजार 579 रुपये निव्वळ उत्पन्न मिळाले. हा आजवरच्या कालावधीतील सर्वाधिक नफा ठरला असून सभासदांनी समाधान व्यक्त केले.

### सभेत सभासदांची मोठी उपस्थिती

सभेचे अध्यक्षस्थान ॲड. जयंत साबळे यांनी भूषविले. उपसभापती सुरेश राऊत हे सोबत होते. आमदार गजानन लवटे, हरिभाऊ बहिरे, शशिकांत मंगळे, शिवाजी हरणे, बाळासाहेब चर्हाटे, प्रा. सुबोध काळमेघ यांच्यासह अनेक मान्यवर या वेळी उपस्थित होते. अहवाल वाचन प्र. सचिव अमर साबळे यांनी केले.

### सुविधा उभारणीचा संकल्प

संचालक मंडळाने भाजीपाला, मिरची व धान्य बाजारात शेतकऱ्यांना सर्व सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला आहे. शेड, स्वच्छतागृहे, रस्ते, कार्यालय, हॉल इत्यादी सुविधा उभारण्याबरोबरच समितीने कोट्यवधी रुपयांच्या जागा आवंटनाची प्रक्रिया सुरू केल्याचे सांगितले.

# नगर परिषद प्रशासनाकडून 240 किलो प्लास्टिक जप्त

## 25 हजारांचा दंड वसूल

महासागर | प्रतिनिधी

**वरुड, ( दि.26 )** – नगर परिषदेच्या पथकाने सिंगल युज प्लास्टिक विरोधात धडक कारवाई करत 240 किलो प्लास्टिक जप्त केले. सोबतच दोषी आस्थापनांना 25 हजारांचा दंड ठोठावला.



राज्यात 01 जुलै 2022 पासून एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिक वस्तूंवर उत्पादन, आयात, साठवणूक, वाहतूक, वितरण, विक्री व वापर यावर संपूर्ण बंदी घालण्यात आली आहे. तरीसुद्धा वरुड शहरात सिंगल युज प्लास्टिक मोठ्या प्रमाणावर वापरले जात असल्याच्या तक्रारी नगरपरिषदेकडे वारंवार येत होत्या. या तक्रारींवर आळा घालण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. नगरपरिषदेच्या पथकाने स्पष्ट सूचना दिल्या आहेत की, सिंगल युज प्लास्टिकचा साठा किंवा विक्री पुन्हा आढळल्यास थेट 10,000 दंड आणि त्याचबरोबर महाराष्ट्र प्लास्टिक व थर्माकोल अधिसूचना 2018 नुसार तीन महिन्यांचा कारावासाची तरतूद आहे. या कारवाईत जगदंबा जनरल स्टोअर्स, कैलास ट्रेडर्स, विक्रम जनरल स्टोअर्स, कुशल जनरल स्टोअर्स आणि श्री महालक्ष्मी जनरल अँड प्रोविजन्स या दुकानदारांकडून प्रत्येकी 5,000 दंड वसूल करण्यात आला. नगरपरिषदेने एका दिवसात एकूण 25,000 दंड आकारला आहे.

ही कारवाई प्रशासक तथा मुख्याधिकारी गजानन भोयर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. यावेळी स्वच्छता निरीक्षक रणजीत सोनेकर, वैभव नरुले, श्रीपाद भगत (शहर समन्वयक), वरुड पोलीस स्टेशनचे कर्मचारी व इतर कर्मचारी उपस्थित होते. शहरातील व्यावसायिकांनी सिंगल युज प्लास्टिकचा वापर त्वरित थांबवावा, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल असे आवाहन नगर परिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

